१. प्रस्तावना : देवाच्या हाकेला ओ देऊन फा. जॉन बोनाल व मदर मारिया राफोल्स यांनी काही स्त्री-पुरूषांसोबत २८ डिसेबंर १८०४ मध्ये आपली मायभूमी सोडून झारागोझाकडे प्रस्थान केले. अवर लेडी ऑफ ग्रेस हास्पीटलमध्ये कार्य करण्यासाठी त्यांनी अवर लेडी ऑफ पिलरची प्रार्थना करून तिच्याकडून संरक्षण मागितले प्रेमाने व तन्मयतेने कार्य करू लागल्या. इथूनच 'सिस्टर ऑफ चॅरिटी ऑफ सेंट ॲन' हया संस्थेचा उगम झाला व सेंट ॲन फॅमिली हया संस्थेचे बिजारोपण झाले.

हया हॉस्पीटलमध्ये काळापरत्वे सिस्टर आणि प्रापंचिक यांच्या कामविभागणीतून व सततच्या परस्पर सहकार्याने कार्याला गती मिळाली व कॅरिजमॅटिक फॅमिली स्थापन झाली.

आज जे कार्य आपण पाहतो त्या कार्याला २०० वर्षाची परंपरा आहे. वेगवेगळया खंडातून वेगवेगळया देशातून , वेगवेगळी पार्श्वभूमी असलेले लोक एकत्र येऊन सिस्टरसमवेत हे सेवाकार्य करीत आहेत.काळाची गरज ओळखून हे प्रेषितीय कार्य करण्यासाठी सिस्टर ऑफ चॅरिटी ऑफ सेंट ॲन हया संस्थेने प्रापंचिकाच्या सहभागाची गरज ओळखून त्यांच्या सहभागाचे स्वागत केले XXVI जनरल चॅप्टर ऑफ २००७ मध्ये प्रापंचिकाचे स्वागत करून सेंट ॲन फॅमिली या नवीन अध्यायास सुरूवात झाली. फा. जॉन बोनाल , सिस्टर व प्रांपचिक मिळून एक मोठी सेंट ॲन फॅमिली तयार झाली.

XXVII एक्स्ट्राऑरडिनरी जनरल चॅप्टर २०१० मध्ये हे नमुद केले आहे की, जी कॅरजमॅटिक भेट आपणास पवित्र आत्म्याद्वारे मिळाली आहे ती जे जीवनात भरकटले आहेत अशा लोकांस दयावी.

जे लोक हया संस्थेच्या संपर्कात येतात व संस्थेशी जवळीक साधतात त्यांना ही पवित्र आत्म्याची देणगी देताना आम्हांस आनंद होतो.

२. स्थापना : येशूला अनुसरून पवित्र आत्म्याचे कार्य पुढे नेताना गरीब व गरजवंतांना मदत करणे म्हणजे आपल्या संस्थापकांसाठी एक पर्वणीच होती. वेगवेगळया परिस्थितीला देवाच्या करूणामय मुखाची प्रचिती आणून दयायची होती. काळानुसार ही कॅरिजमॅटील चळवळ जिवंत ठेवण्यात आपणा सर्वांचाच सहभाग आहे.

सेवा हा कार्याचा मुलभूतपाया आहे. त्या सेवाकार्यातून आपणास देवाचे दर्शन घडते. ज्याने आपल्यावरील प्रेमाखातर आपला एकुलता एक पुत्र या धरतीवर पाठविला की जेणेकरून मानवजातीचे तारण व्हावे.

जसे देवाने आपल्यावर प्रिती केली तशीच प्रिती आपण शेजाऱ्यावर करावी हया भावनेने प्रेरित होऊन आपल्या संस्थापिका व प्रथम सिस्टर्स हयांनू सर्वांना आपल्या संस्थेत सामावून घेतले. सेंट ॲन फॅमिली हे येशूप्रमाणे देवाच्या मुलाचे कुटुंब आहे आणि सार्वभोम कार्य करताना ते सत्यात उतरवून जास्तीत जास्त मानवतावादी बनविणे हे आपले उद्विष्ट आहे.

येशू ख्रिस्ताच्या समर्पित जीवनामुळे अशी एक नवीन रचना उदयास आली. पवित्र आत्म्याचे दान मिळून सामुहिकपणे ते निरनिराळे कार्य करण्यात सक्रिय सहभाग घेऊ लागले. ही रचना म्हणजे 'कॅरिजमॅटीक कुटुंब होय. (Ref. NWH 122) खुप संस्था हया निष्कर्षापर्यंत पोहचल्या आहेत की हया कॅरिजमॅटीक चळवळीत प्रांपचिकाचा सहभाग आवश्यक आहे. हया नवीन अध्यायामूळे प्रांपचिक आणि समर्पित जीवन जगणारे म्हणजे धर्मगुरू व धर्मभगिनी यांच्या नात्यात एक नवीन पर्व सुरू होईल अशी प्रबळ आशा वाटत. सामुहिक सहकार्याची भावना हे पवित्र आत्म्याचे दान आहे की ज्यामुळे आपण समर्पित, जबाबदारीने व ख्रिस्ती विश्वासात जगून आपले आध्यात्मिक जीवन समृध्द करतो.

३. व्याख्या ः सेंट ॲन्स कुटुंब.

सेंट ॲन्स फॅमिली म्हणजे अशी लोकं जी ख्रिस्ती विश्वासात सेवाकार्य करीत आहेत. प्रत्येकजण आपला व्यवसाय, आपले अस्तित्व दैवी प्रेमाचे साक्षीदार बनून मदर मरिया राफोल्स व फा जॉन बोनाल यांच्या प्रेरणेने प्रेरित झाली आहे.

हे एक विस्तृत कुटुंब आहे. हयात कोणत्याही वयोगटातील, कोणतेही लिंग, धर्म, भाषा जात किंवा कोणताही सामाजिक दर्जा असलेले स्वेच्छेने आलेल्या लोकांचा समावेश आहे.

हया कुटुबातील व्यक्ती प्रार्थना, बाधणी समर्पण व परस्पर सलोखा हया चार आधारस्तंभाला प्रमाण मानते.

४. ओळख - परिचय - ओळखपत्र

सेंट ॲन्स फॅमिली या संस्थेतील व्यक्तीची स्वतःची ओळख

नाजरेयकर येशूच्या शिकवणुकीकडे आकर्षित होऊन मानवतावादी दृष्टीकोन ठेवण्याची इच्छा धरणे

परमेश्वरावरील विश्वास व सर्वसमावेशक सेवाकार्य करून गरीब व गरजवंतांना सहकार्य करणे.

देवाच्या वचनाचे पालन करणे किंवा प्रार्थनेत राहणे.

दुस-याच्या गरजाचा अगदी साधेपणाने, प्रसन्न वदनाने व जबाबदारीने विचार करून त्याचे स्वागत करणे.

आपल्या कार्यप्रती जबाबदारीने वागून मनात दयाभाव ठेवणे.

गरजवंताना मदत करण्यास स्वतःला वाहून घेणे व त्यांची परिस्थिती सुधारण्यास मदत करणे.

सहकाराची भावना ठेवून एकजुटीने राहणे.

कौटुंबिक भावना जोपासणे.

मानव,अध्यात्म आणि कॅरिजमॅटीक कुंटुंबात स्वेच्छेने काम करण्यास तयार असणे.

स्वेच्छेने आपल्या व्यवसायाप्रमाणे हया कुंटुंबात सामील होणे.

५. सर्वसमावेशक अटी (नियम)

सेंट ॲन फॅमिली या संस्थेच्या सभासदांच्या काही अटी -

अ) संस्थेचे सभासदत्व फक्त संस्थेत काम करता किंवा संस्थेशी निगडीत काही उपक्रमात भाग घेता यावरून ठरत नाही.

जी मुलं या संस्थेत कार्यरत आहेत त्यांची क्षमता व कुवत बघून त्यांना पोषक वातावरण तयार करून मगच सभासदत्व बहाल करता येते.

ब) समान हेतूसाठी विश्वव्यापी पातळीवर एकत्र येऊन विचारविनिमय करणे.

क) सेंट ॲन फॅमिलीच्या कोणत्याही कार्यक्रमात सहभाग घेणे.

ड) कार्यात परिणामकारकता दाखविणे.

६. सहभागाचे मार्ग

हया संस्थेचे सभासद प्रार्थना, बांधणी, समर्पण (त्यागी वृत्ती) व परस्पर सलोखा हया चार स्तंभांशी जोडलेले आहेत.

१) प्रार्थना - ख्रिस्तीविषयी माहिती मिळविणे, त्यापर्यत पोहचणे , त्याच्याशी नाते जोडणे. देवाच्या शब्दांचे चिंतन करणे.

शिबिरांचे आयोजन करणे व वेळोवेळी प्रबोधन करणे.

पवित्र मिस्सा, पवित्र तास व उपासनाविधिचे आयोजन करणे.

ख्रिस्तसभेने नेमून दिलेल्या काही महत्त्वाच्या काळात उदा. नाताळ , आगमनकाळ , उपवासकाळ, पुनरूत्थान काळ किंवा पवित्रआत्म्याचं आगमन हया काळात विशेष सभा घेणे.

आतरधर्मिय प्रार्थना

२) बांधणी ( श्रद्धाबांधणी) एखादया विषयावर विचारविनियम करण्यासाठी , अध्यात्मिक बायबलावर , कॉग्रीगेशनल, भिन्नसंकृती, भिन्न पंथीय समाज स्तरावर सभा घेणे, प्रबोधन करणे किंवा त्यावर समुहाने एकत्र येऊन कार्य करणे.

३) परस्पर सलोखा

वैयक्तिक, सामाजिक, राष्ट्रीय प्रोव्हीन्शीयल किंवा आतरराष्ट्रीय पातळीवर सभा घेऊन एकत्रितणे, परस्पर सामंजस्याने कार्य करणे.

संस्थेशी संबंधित काही घटना व सण साजरे करणे.

परधर्मियांचे धार्मिक सोहळे, त्यांच्या परंपरा चालिरितीचा आदर करून ते साजरे करण्यात सहभाग घेणे.

आंतरधर्मिय संवाद साधणे.

उन्हाळी शिबिरं आयोजित करणे.

वर्कशॉप

युवाशिबिरं

नेमून दिलेल्या वेळा व्यतिरिक्त किंवा शाळेव्यतिरिक्त दुस-या वेळेत नितिमुल्याचे धडे देणे.

माजी विद्यार्थ्यांच्या सभा घेणे.

सांस्कृतिक कार्यकम

७. समर्पण

मिशनरी शिबिरं

उन्हाळी शिबिरं

स्वयंसेवी उपक्रम

निराश्रितांस आश्रय

सामाजिक उपक्रम

सेंट ॲन मिशनरी स्वेच्छाकार्य

स्त्रियांचे मनोधैर्य वाढवून त्यांना उत्तेजन देणे.

मेडिकल कॅम्प

कुंटुंबाना - घराना भेटी देऊन ज्यांना बघण्यासाठी कोणी नाही, जे कठीण परिस्थितीत जीवन जगत आहेत त्यांची विचारपूस करून त्यांना मदतीचा हात देणे.

८) संस्था

८.१ बाधणी

अ) स्थानिक पातळी

समुह अथवा सहा सदस्यासह प्रापंचिक समिती

सहाय्यक प्रापंचिक आणि सिस्टर (शक्य असल्यास)

सचिव

खजिनदार

सहापेक्षा कमी सदस्य असल्यास SAF मधील एक सदस्य सहाय्यक पदाची जबाबदारी सांभाळू शकतो.

जर एखादया कार्यसभेत सिस्टर प्रातिक पातळीवर उपलब्ध नसल्यास तो कार्यभार एखादी जबाबदार व्यक्ती सांभाळू शकते.

ब) प्रांतिक / प्रातिनिधीक पातळी

सिस्टर प्रोविन्शियल

SAF समुपदेशक

मिश्र प्रांतिक समुह (सिस्टर आणि प्रापंचिक) सहाय्यक, सचिव आणि खजिनदार

प्रत्येक प्रातिनिधीक पातळीवर संकलित केलेल्या सभासदांची संख्या त्या त्या प्रांताच्या रचनेवर अवलंबून असतात. (सर्वसाधारण विभाग , राज्य, प्रांत, देश , बेट यातून निवडलेले प्रतिनिधी)

क) खंडपातळी (कंण्टीनेण्टल पातळी)

SAF मधील साधारण जबाबदार समुपदेशक

प्रत्येक प्रांतातील SAF समुपदेशक

प्रत्येक प्रांतातील प्रापंचिक सहाय्यक

ड) सर्वसाधारण पातळी

जनरल सुपिरियर

SAF चे जबाबदार समुपदेशक

SAF चे प्रांतिक समुपदेशक

प्रापंचिक सहाय्यक प्रातिनिधीक पातळी (जो स्वतःच्या खंडात व विविध खंडात कार्यरत असलेला)

८.२ कार्याची विभागणी

प्रत्येक समितीच्या संदर्भातून आलेल्या जबाबदारीची विभागणी खालीलप्रमाणेः

दुवा कोऑर्डिनेटर - स्थानिक व प्रांतिक पातळीवर आलेली समिती

विविध उपक्रमांचे चार स्तंभावर आधारित नियोजन करणे.

(प्रार्थना, समाज बांधणी , समर्पण, बंधुभाव)

जबाबदारी गृहीत धरून चांगले कार्य करणारी समिती/ प्रापंचिक समिती

नियोजनाचे आणि समितीच्या कार्याचे मुल्यमापन

सभेची तयारी

खजिनदारासमवेत निधी वाढविण्यासाठी सहाय्य

इतर सहाय्यकांच्या भेटी

तिच्या/ त्याच्या समुहाच्या विविध उपक्रमांची मांडणी करणे.

सोशल नेटवर्कींग , वॉटसॲप समुह ब्लॉग्ज यांच्या योग्य वापराची हमी देऊन SAF शी सपर्क जोडणे.

SAF च्या समुपदेशकाबरोबर स्थानिक व प्रांतिक पातळीवर सपर्क साधणे.

सचिव

प्रत्येक सभेचा अहवाल लिहिणे

SAF च्या इतर समितीच्या अंर्तबाहय पातळीवर सपर्क ठेवण्याची जबाबदारी

समिती व सभासदाची माहितीची नोंद ठेवणे. विविध उपक्रमांचे नियोजन करून खालील मुददयांच्या आधारे नोंद ठेवणे.

( उपक्रम , दिनांक, विषय, सहभाग/स्पर्धक)

खाजिनदार

आर्थिक परिस्थीतीप्रमाणे सहाय्यकाशी ( कोऑर्डिनेटर) संपर्क करून विविध समित्यांचे अकाऊण्ट वर्षातून एकदा आर्थिक परिस्थीतीचा आढावा घेणे.

निधी उभारण्यासाठी सहाय्यकाबरोबर एकत्रित कार्य करणे.

सभासदाकडून आलेला ऐच्छिक निधी व ज्या कार्यक्रमातून निधी वाढेल असे उपक्रम आयोजित करणे.

सर्व निधी प्रांतिक पातळीवर (प्रोविन्शियल) जॉईण्ट अकाऊण्ट ठेवून जमा करणे.

या सेवेसाठी ३ वर्षासाठी सदर सदस्यांची निवड केली जाते. (पुर्ननिवडीची शक्यता असू शकते.

या विशेष कार्यासाठी विविध पातळीवर समिती निर्माण केली जाईल. समुहातील सहाय्यकांच्या निवडीची येथे गरज नाही. परंतू जे सदस्य एखादया विशेष कार्यासाठी प्रतिनिधींची निवड केलेली आहे.

८.३ कार्याची आखणी

SAF सदस्य विशेष प्रसंगी

समुहबांधणी

सभा,सोहळे,रचना,समाज, प्रार्थना गाठीभेटी इ. सहभागी होणे.

प्रत्येक SAF च्या विकासासाठी विविध पातळीवर उपक्रम आयोजित करणे. त्यांची पूर्तता करण्यासाठी जबाबदारीने सहभाग घेणे.

साधारण/ प्रांतिक चाप्टर मध्ये ( OL११९ आणि १४0) सांगितल्या प्रमाणे प्रापंचिक समुहाच्या निवड प्रक्रियेत सहभागी होणे.

दिलेल्या भागातील इतर समुह जमात यांच्याशी संपर्क साधणे.

गरजू व गरीब यांच्या गरजा जाणून घेऊन सढळ हस्ते मदत करणे.

निसर्ग संवर्धन करण्यासाठी जीवनशैली आत्मसात करणे मिळालेल्या नैसर्गिक स्त्रोतांचा योग्य वापर करून भूमातेचे रक्षण करणे.

८.४ संपर्क साधण्याची साधने

संपर्क साधण्यासाठी खाली दिलेल्या कोणत्याही एका साधनाचा वापर

व्यक्तिगत भेटी

समुह भेटी

प्रांतिक व साधारण पातळीवरील गाठीभेटी

परिपत्रक

विविध प्रांतिक ब्लॉग्ज

सोशल नेटवर्कद्वारा अधिकृत प्रोफाइल

संस्थेच्या विभागाचे वेब पेज

इ-मेल, फोन, एस्.एम्.एस, वॉटसअॅप

शब्दसंग्रह

चॅरिटी (धर्मार्थ) - देवाच्या प्रेमात सहभागी होणे.

चॅरिझम - देवाच्या राज्यात देवाकडून मिळालेली विशेष देणगी

कमिटमेंट (समन्वय) -दुस-यातील चांगल्या गुणांचा शोध

कम्युनिटी (समाज) - जीवनाच्या सामान्य प्रकल्पात स्वतःची ओळख टिकवणारा SAF चा जबाबदार समुह

कॉन्स्टिटयूशन (संविधान) - धार्मिक संस्थेतील वरिष्ठ नियम येशूने नेमून दिलेल्या नियमांवर आधारित कार्य करणे.

फॉरमेशन (समाज बांधणी) - उपक्रमशील, ज्यांच्याकडे पुरेसे ज्ञान अनुभव, दृष्टीकोन व्यक्ती विकासासाठी योग्यरित्या मोजमाप करणा-या व्यक्ती.

जनरल चाप्टर - सर्व खंडातील संस्थेंचे सर्व प्रतिनिधी हे सर्वात वरिष्ठ मंडळातील सर्व प्रतिनिधी एकत्रित येतात. सामान्य अथवा विशेष कार्य इ. गोष्टीवर चर्चा करणे (दर ६ वर्षानी होणा-या निवडणुकांवर चर्चा) काही ठराविक वेळी SAF समितीतील प्रापंचिक सदस्य सभेस उपस्थित राहू शकतात (Ref ११६-११७ आणि OL ११९)

पाया- सहकार्य आणि विकास
शौर्य - जीवनासाठी योग्य व आवश्यक गोष्टी
आदरातिथ्य - उपलब्धता, दुर-यांची सेवा, काळजी प्रेम यासाठी देवाकडून मिळालेली देणगी
ओळख - स्वतःसाठी व समुहासाठी दिलेली सेवा.
जॉन बॉनल संस्था - सिस्टर्स ऑफ चॅरिटी ऑफ सेंट ॲनचे संस्थापक
LO प्रापंचिक - प्रंपचातून ख्रिस्त सभेची सेवा करणे (L४३१)

वैद्यकीय शिबीर /मिशन - वैद्यकिय क्षेत्रातील जाणकरांनी केलेली ऐच्छिक सेवा.

सेवेसाठी केलेले (देवाकडून मिळालेली देणगी)- SAF सदस्यांकरिता देवाच्या प्रेमाने केलेली सेवा.

कार्यशिबीर - ख्रिस्ताच्या शिकवणुकीनुसार उपक्रम शहरापासून दूर असलेल्या खेडेगावात जाऊन SAF सदस्यांनी आयोजित केलेली शिबीरे.

न्यु पॉवर्टी - नविन तंत्रज्ञान जागतिकीकरण , सामाजिक विषमता, सांस्कृतिक संघर्ष, धार्मिक मुलभूत प्रश्न व इतर संबधित प्रश्न यापासून वंचित असलेले लोक.

प्रषितीय कार्य - ख्रिस्तसेवा ही ख्रिस्तसभेच्या चर्चच्या तीन मिनिस्ट्रीवर अवलंबून असते ( उपासना, श्रद्धाबांधणी, सेवा)

गरीबी- प्रत्यकजण गरीबीत असतो काही आर्थिक, बौद्धिक, सामाजिक, शारीरीक, कौशल्य प्रोविन्शियल/ डेलिगेशन संस्थेचे भौगोलिक विभाग, प्रांत्रिक विभागातील, प्रातिनिधीक पातळीवर सभासद समिती.

प्रोविन्शियल/ डेलिगेशन चॅप्टर सर्व विभागातील प्रांत्रिक / प्रातिनिधीक पातळीवर सर्व सभासद एकत्र येऊन चर्चासत्र आयोजित करणे जे SAF चे सर्वसाधारण सभासद आहेत त्यांनी हया कार्य सत्रास हजर राहाव. (Ref १३८,१३९, १४0 आणि OL १४0)

Shared mission हे मिशन कार्य सिस्टर्स आणि प्रांपचिक यांच्या सहकार्याने उभे राहणे .

Spirituality आध्यात्मिक आणि कृतज्ञता या दोघांच्या सहाय्याने व्यक्तीचा किंवा समुहाच्या आंतरिक जीवनात आध्यात्मिकता येते .

Task प्रत्येक कृती उपक्रम, कार्य आणि सेवा मिशन विकसीत करणे .

Vocation जीवनाच्या ठराविक मार्गावर देवाचे पाचारण .